दैनिक
# महाराष्ट्र जीत
मुख्य संपादक : सागर राणा अंभोरे
RNI No - MHMUL/25/A0788

■ वाशीम ■ बुधवार, १३ मे २०२६ ■ वर्ष : ३ ■ अंक : २६ ■ पाने : ४ ■ किंमत : ५ रूपये ■ Title code:- MAHMUL039353

## राज्यातील ५४५९ पोलिसांना घराची लॉटरी,
## सरकारकडून १७६८ कोटी मंजूर!

महाराष्ट्र जीत

**मुंबई :** राज्यातील हजारो पोलिस कर्मचाऱ्यांच्या गृहप्रश्नावर महायुती सरकारनं मोठा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलिसांसाठी १७६८.०८ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी दिल्याची घोषणा केली आहे. या निर्णयाचा लाभ राज्यातील ५४५९ पोलिस कर्मचाऱ्यांना मिळणार आहे.






महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण आणि कल्याण महामंडळाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावांना मान्यता देत घरबांधणी अग्रीम स्वरूपात राज्य सरकारकडून आर्थिक मदत उपलब्ध करून दिली जाणार आहे. जनतेच्या सुरक्षेसाठी दिवस-रात्र कार्यरत असलेल्या पोलिसांना स्वतःचे घर मिळावे, यासाठी आपण सुरुवातीपासून आग्रही असल्याचं मुख्यमंत्री फडणवीस यांनी सोशल मीडियात पोस्ट करून म्हटलं आहे. २०१४ ते २०१९ या कालावधीत पोलिसांसाठी व्याजसवलत अनुदान योजना राबवण्यात आली होती. मात्र, महाविकास आघाडी सरकारच्या काळात ही योजना बंद करण्यात आली होती. त्यानंतर महायुती सरकार सत्तेत आल्यानंतर ही योजना पुन्हा सुरू करण्यात आल्याचंही फडणवीस यांनी नमूद केलं.

**४० ते ४५ हजार घरे उभारली जाणार-** मुंबई शहर आणि उपनगरांतील सुमारे ५ कोटी चौरस फूट जागेवर अंदाजे २० हजार कोटी रुपयांच्या खर्चातून ४० ते ४५ हजार निवासी घरे उभारली जाणार आहेत. या प्रकल्पासाठी राज्य सरकारकडून ३० टक्के निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे.

## वंचित बहुजन शोषित कामगार आणि कष्टकऱ्यांचे आधारस्तंभ श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर यांचा वाढदिवस स्वाभिमानी दिवस म्हणून साजरा

महाराष्ट्र जीत

**सिन्नर प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर यांचा वाढदिवस वंचित बहुजन आघाडीच्या वतीने हॉटेल पंचवटी सिन्नर येथे भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष आदरणीय भीमराव यशवंतराव आंबेडकर साहेब यांच्या हस्ते केक कापून साजरा करण्यात आला त्याप्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष विल्यम भाऊ शिंदे युवा तालुकाध्यक्ष तुषार अण्णा जाधव मार्गदर्शक रमाकांत जी वाघ सिन्नर तालुका उपाध्यक्ष



ज्ञानदेव जगताप भास्कर अडांगळे सिन्नर नगरपालिकेचे नगरसेवक अनिल सरवार तालुका संघटक उत्तमराव दिवे शरद अण्णा अडांगळे तालुका महासचिव अविनाश जगताप सहसचिव सुनील आडांगळे अशोकराव जगताप तालुका प्रवक्ते धम्मानंद डोंगरदिवे तालुका उपाध्यक्ष योगेश पठारे विजय मोरे भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष हेमंत निकम दत्ताभाऊ पगारे रामा जाधव आकाश मोकळ कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थितत होते

## विरारमध्ये मंडल अधिकाऱ्यावर जीवघेणा हल्ला तर आत्माराम पाटील यांचा मृत्यू!


महाराष्ट्र जीत

**मुंबई प्रतिनिधी :(सतिश पाटील ) :** आज सरकारी अधिकारी देखिल सुरक्षित नाहीत राज्यात?विरारच्या शिरगाव परिसरात मंडल अधिकारी प्रभाकर पाटील यांच्यावर अज्ञात हल्लेखोरांनी जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात त्यांचे सहकारी आत्माराम पाटील यांचा मृत्यू झाला आहे. विरारमध्ये मंडल अधिकाऱ्यावर जीवघेणा हल्ला; सहकाऱ्याचा मृत्यू, हल्ल्यामागचं कारण अस्पष्ट

पालघर जिल्ह्यातील विरारमध्ये महसूल विभागातील अधिकाऱ्यावर झालेल्या जीवघेण्या हल्ल्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. विरारच्या शिरगाव परिसरातील खदानीजवळ मंडळ अधिकारी प्रभाकर पाटील यांच्यावर अज्ञात हल्लेखोरांनी लाकडी दांड्याने हल्ला केला. या घटनेत त्यांचे सहकारी आत्माराम पाटील यांचा मृत्यू झाला असून प्रभाकर पाटील गंभीर जखमी झाले आहेत.

हल्लेखोरांनी अधिकाऱ्यांच्या वाहनाचीही मोठ्या प्रमाणात तोडफोड केली. घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत.

शिरगावच्या खदानीजवळ अज्ञात हल्लेखोरांचा हल्ला





मिळालेल्या माहितीनुसार, प्रभाकर पाटील आणि त्यांचे सहकारी आत्माराम पाटील हे कामानिमित्त शिरगाव परिसरात गेले होते. यावेळी काही अज्ञात व्यक्तींनी अचानक त्यांच्यावर हल्ला चढवला. लाकडी दांडक्यांनी बेदम मारहाण करण्यात आली.

सहकारी आत्माराम पाटील यांचा मृत्यू

या हल्ल्यात आत्माराम पाटील गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. मंडळ अधिकारी प्रभाकर पाटील यांना गंभीर दुखापत झाली असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. या घटनेमुळे महसूल विभागात शोककळा पसरली आहे.

सरकारी वाहनाची मोठ्या प्रमाणात तोडफोड केली.

हल्लेखोरांनी प्रभाकर पाटील यांच्या वाहनाचीही मोठ्या प्रमाणात तोडफोड केली. त्यामुळे हा हल्ला पूर्वनियोजित होता का, याचाही तपास पोलीस करत आहेत. घटनेची माहिती मिळताच विरार पोलीस आणि फॉरेन्सिक तज्ज्ञांचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. परिसराचा पंचनामा करून पुरावे गोळा करण्यात आले आहेत.

**हल्ल्यामागील कारण अद्याप अस्पष्ट**

हल्ल्यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. अधिकृत कामकाज, जमीन व खननाशी संबंधित वाद किंवा अन्य कारणांमुळे हा हल्ला झाला असण्याची शक्यता तपासली जात आहे. या घटनेनंतर शिरगाव आणि विरार परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. सरकारी अधिकाऱ्यांच्या सुरक्षेबाबतही गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.सरकार मायबाप काय चालू आहे

राज्यात सरकारी अधिकारी देखील सुरक्षीत नाही युपी, बिहारची सारखी परिस्थिती पोलिस, कायद्याचा धाक नाही गुन्हेगारांना? दिवसेंदिवस बलात्कार,भ्रष्टाचार घटनांचे प्रमाणात वाढ होत आहे कोणीही असो कठोर कारवाई झालीच पाहिजे आणखी किती नाहक बळी जाणार,,,


## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानंतर सोन्याच्या दरात घसरण झाली

### शेयर्स बाजार 12 टक्क्यापर्यंत घसरले

महाराष्ट्र जीत

**मुंबई प्रतिनिधी :(सतिश पाटील ) :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकत्याच केलेल्या आवाहनानंतर भारतीय शेअर बाजारात, विशेषतः ज्वेलरी क्षेत्रातील कंपन्यांच्या शेअर्समध्ये मोठी घसरण झाली असून सोन्याच्या दरातही किरकोळ घसरण पाहायला मिळाली आहे. या घडामोडींची प्रमुख कारणे आणि परिणाम खालीलप्रमाणे आहेत पंतप्रधान मोदींनी परकीय चलन साठा वाचवण्यासाठी नागरिकांना पुढील एक वर्ष 'सोने खरेदी टाळण्याचे' आवाहन केले आहे.याशिवाय इंधन बचतीसाठी पेट्रोल-डिझेलचा वापर कमी करणे आणि अनावश्यक परदेश प्रवास टाळण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे.शेअर मार्केटवर परिणाम पंतप्रधानांच्या या वक्तव्यानंतर ज्वेलरी कंपन्यांचे शेअर्स कोसळले. आणि यांसारख्या आघाडीच्या कंपन्यांचे





शेअर्स सोमवारी १२ टक्क्यांपर्यंत घसरले.गुंतवणूकदारांनी भीतीपोटी ज्वेलरी क्षेत्रातील शेअर्सची मोठ्या प्रमाणावर विक्री सुरू केली आहे. सोन्याचे भाव पंतप्रधानांच्या आवाहनानंतर सोन्याच्या दरात घसरण झाली.२४-कॅरेट सोन्याचे भाव सुमारे ₹२२० नी कमी होऊन ₹१,५२,२८० प्रति १० ग्रॅमवर आले आहेत.काही शहरांमध्ये सोन्याच्या दरात ₹२०० ते ₹३०० प्रति १० ग्रॅमपर्यंत घसरण झाली आहे.इतर प्रमुख कारणे आखाती देशांमधील तणाव: इराण आणि अमेरिकेतील संघर्षाचा जागतिक आर्थिक घडामोडींवर परिणाम होत आहे. कच्च्या तेलाच्या किमती $१०५ प्रति बॅरलच्या वर गेल्यामुळे डॉलरच्या तुलनेत रुपया कमकुवत झाला आहे. आयात बिल: भारताचे सोन्याचे आयात बिल विक्रमी $७२ अब्जांवर पोहोचल्याने परकीय चलन साठ्यावर ताण आला आहे.थोडक्यात सांगायचे तर, मोदींच्या आवाहनाचा थेट परिणाम म्हणून ज्वेलरी क्षेत्रातील शेअर्समध्ये 'भूकंप' आला असून सोन्याची खरेदी काही काळ कमी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यावर बरेच सोने व्यापारी नाराज झाले आहेत कारण त्यांनी लग्न सराईच्या आधारावर चढ्या भावाने सोने खरेदी केले होते. दुसरी कडे मोठे शेयर देखील खाली आले.

## वंचित बहुजन आघाडी दिंडोरी तालुका आयोजित बहुजन हक्क निर्धार परिषद इतिहास घडवण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहा : बाळासाहेब शेजवळ, तालुका अध्यक्ष

महाराष्ट्र जीत

**दिंडोरी प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** देशाची वास्तविक परिस्थिती आणि सध्या सुरू असलेले राजकीय घडामोडीचे चक्र आपण सर्व जाणतो या पार्श्वभूमीवर देशातील आदिवासी बौद्ध व इतर अनुसूचित जाती मुस्लिम इतर सर्व मागासवर्गीय घटकांचे जीवनमान चिंताजनकरीत्या उदासींतेकडे जात आहे जागतिक युद्ध सदृश्य परिस्थितीचे परिणाम सामाजिक न्यायाचे प्रश्न आदिवासी जमातीचे स्थानिक प्रश्न आरक्षणाचे वाद क्रिमीलीयर मतदार यादीत त्रुटी आणि भारतीय संविधानासमोर निर्माण झालेली आव्हाने प्रश्न मध्ये बहुजन समाजाच्या आत्मसन्मान तुडवला जात आहे या विषयावर बहुजन समाजात गंभीर चिंतन अभ्यास होणे ही काळाची गरज आहे या पुरोगामी मन्हवलेल्या गेलेल्या महाराष्ट्रात धार्मिक असतील तर दिसत आहे महामानवाचा अनादर केला जात आहे इतिहासाची विकृती करून धार्मिक जातीय ते निर्माण केला जात आहे छत्रपती शिवरायांच्या स्वराज्यात अशा प्रकारच्या अन्यायाला कधी स्थान नव्हते असा आमचा ठाम विश्वास आहे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले आहे जो समाज आपला इतिहास विसरतो तो समाज इतिहास


राष्ट्रीय युवा नेते

घडू शकत नाही या विचाराच्या प्रेरणेतून आणि बहुजन समाजाच्या एकजुटीसाठी आमच्या पिढीची जागरूकता व्यक्त करण्याच्या हेतूने बहुजन हक्क निर्धार परिषद आयोजित करण्यात येत आहे या सभेस मार्गदर्शन करण्यासाठी फायर ब्रँड नेते राष्ट्रीय युवा नेते सुजात दादा आंबेडकर यांच्या उपस्थितीत पार पडणार आहे याप्रसंगी राज्याच्या प्रवक्त्या वंचित बहुजन आघाडी दिशा ताई पिंकी शेख कार्यक्रमाचे अध्यक्ष वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा अध्यक्ष चेतन दादा गांगुर्डे या कार्यक्रमाचे उद्घाटक मा. प्रा. किरण गांगुर्डे ग्रामपंचायत सदस्य वनी वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हा महासचिव संविधान गांगुर्डे स्वागताध्यक्ष वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा


तालुकाध्यक्ष

उपाध्यक्ष प्रशांत अहिरे प्रमुख उपस्थिती लाभणार आहे शुक्रवार दिनांक 15 मे 2026 रोजी सकाळी 11 वाजता खुशी बँक्वेट हॉल मनी पिंपळगाव रोड वनी तालुका दिंडोरी नाशिक या ठिकाणी सभेचे आयोजन करण्यात आले आहे या कार्यक्रमाचे निमंत्रक तालुका महासचिव दिंडोरी समाधान शिरसाट उपाध्यक्ष विशाल गांगुर्डे तुषार मोरे शहराध्यक्ष वंचित बहुजन आघाडी वणी संकेत गांगुर्डे सुमित दुर्धवळे सिद्धेश बागुल मयूर झोटिंग हार्दिक गांगुर्डे वैभव शिरसाट साहिल गांगुर्डे प्रवीण गांगुर्डे सोबत गांगुर्डे धीरज बागुल आकाश दुर्धवळे आदित्य गांगुर्डे तसेच वंचित बहुजन आघाडी दिंडोरी तालुका युवा आघाडी व महिला आघाडी भारतीय बौद्ध महासभा समता सैनिक दल बिरसा ब्रिगेड नाशिक यशोधरा महिला संघ वनी दिशांतर सोशल फाउंडेशन वनी प्रागतिक विचार मंच वनी लोक लढा सांस्कृतिक चळवळ दिंडोरी तालुका भीमजोत तरुण मित्र मंडळ दिंडोरी पंचशील मित्र मंडळ करंजवण मुस्लिम युवा वणी आदींचा मोलाचा सहभाग लाभणार आहे तसेच तालुका महासचिव वंचित बहुजन युवा आघाडी विकी दुर्धवळे तसेच प्रमुख उपस्थिती मिठूलाल राका प्राकृतिक विचारमंच वनी दिनेश जाधव महानगर अध्यक्ष केशव भोये ग्रामपंचायत सदस्य समाधान घोडेस्वार लोक लढा सांस्कृतिक चळवळ शौकत मणियार सामाजिक कार्यकर्ते ॲड भाऊसाहेब अहिरे तालुका निरीक्षक तसेच मोलाचे मार्गदर्शक रवी अण्णा पगारे लीनाताई खरे बाळासाहेब शिंदे विश्वनाथ भालेराव योगेश भुसार पंडित नेटावटे नितीन दादा भुजबळ सम्राट पगारे राहुल गांगुर्डे आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित लावणार आहे.

पंचक्रोशीतील सर्व आंबेडकर अनुयायी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहभाग नोंदवावा असे आव्हान बाळासाहेब शेजवळ यांनी केले आहे

## लातूर येथे शिक्षिका सविता जगताप यांना "शिक्षण रत्न" पुरस्काराने गौरव

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत / प्रदीप पोटफोडे :** दि. १० मे रोजी लातूर येथे आयोजित करण्यात आलेल्या दुसऱ्या बौद्ध साहित्य संमेलनामध्ये सामाजिक, शैक्षणिक व साहित्यिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, कोळी बोडखा येथील पदवीधर शिक्षिका सौ. सविता बाळासाहेब जगताप यांना शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर "शिक्षण रत्न" पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.

विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणाची जडणघडण, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, संस्कारमूल्य शिक्षण तसेच प्रात्यक्षिकांसह शिक्षण यांसारखे नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम प्रभावीपणे राबविल्याबद्दल त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांच्या या यशाबद्दल जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, कोळी बोडखा येथील मराठी व उर्दू या दोन्ही माध्यमातील सर्व शिक्षक-शिक्षिका, मुख्याध्यापक तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य यांनी त्यांचे अभिनंदन केले.

तसेच, या साहित्य संमेलनाच्या संयोजन समितीत सक्रिय सहभाग नोंदविल्याबद्दल आणि शासकीय सेवेत कार्यरत राहून वैयक्तिक वेळेत सामाजिक कार्यात योगदान दिल्याबद्दल आयु. नितीन भागवत गायकवाड यांचाही



विशेष सन्मान करण्यात आला. संमेलन यशस्वी करण्यासाठी त्यांनी केलेल्या कार्याची उपस्थित मान्यवरांनी प्रशंसा केली.

संमेलनात विविध परिसंवाद, कथाकथन, कविसंमेलन तसेच सामाजिक विषयांवरील विचारमंथनाचे कार्यक्रम उत्साहात पार पडले. अनेक साहित्यिक, विचारवंत आणि सामाजिक कार्यकर्त्यांची उपस्थिती या कार्यक्रमाला लाभली होती.

या संमेलनाचे अध्यक्ष म्हणून डॉ. प्रशांत गायकवाड (बौद्ध साहित्य अभ्यासक) यांनी मार्गदर्शन केले. स्वागताध्यक्ष म्हणून मा. चंद्रकांत शिंदे (माजी नायब तहसीलदार), उद्घाटक म्हणून जयश्रीताई सोनकांबळे (महापौर, लातूर महानगरपालिका), तर संयोजक म्हणून राजेंद्र कांबळे (संपादक, अर्थसत्ता न्यूज) यांनी भूमिका पार पाडली. यावेळी असंख्य नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सविता नितीन गायकवाड यांनी केले. प्रास्ताविक राजेंद्र कांबळे यांनी तर आभार प्रदर्शन मंगलताई कांबळे यांनी केले.

## संपादकीय

### जल वाहतुकीचा नवा अध्याय

मुंबई ते कोकण दरम्यान जलमार्गांचा नवा अध्याय उलगडत असून, वाढवण बंदर ते रेडी बंदरापर्यंत विस्तारणारी जल वाहतूक योजना राज्याच्या दळणवळण नकाशात मोठा बदल घडवू शकते.

कोकणात अगदी मुंबईपासून सिंधुदुर्गपर्यंत जल वाहतुकीचे नवे मार्ग तयार होऊ लागले आहेत. वसई-विरार, कल्याण, मीरा भाईंदर आणि पालघर, डहाणूपर्यंत जल वाहतूक मार्गांचे सर्वेक्षण एका बाजूला सुरू आहे; तर दुसऱ्या बाजूला रायगड जिल्ह्यातील अलिबाग, रोहा, मांडवा, दिघी ते जयगड, जयगड ते विजयदुर्ग, मालवण, वेंगुर्ले असे जलमार्ग सुरू करण्याचे प्रस्तावित आहे. एकूण 21 जलमार्ग सुरू करण्यासाठी विविध करारही झाले आहेत. 2500 कोटींची त्यासाठी गुंतवणूक आणण्यात येणार असून रायगड, रत्नागिरी आणि पालघर येथे जहाज बांधणी प्रकल्प सुरू करण्याचे नियोजनही राज्य सरकारने केंद्र सरकारच्या मदतीने सुरू केले आहे. मुंबई, ठाणे, कल्याण, वसई येथील खाडी किनारा येथेही जल वाहतुकीचा पर्याय विकसित केला जात आहे. दर परवडणारे असल्याने जल वाहतुकीचा विस्तार करण्याचे सरकारचे नियोजन आहे. यासाठीच नॉर्वे येथील जल वाहतूक तज्ज्ञ कंपनी हायके यांना याबाबतचा अहवाल देण्यास सांगण्यात आले आहे. त्यासाठी सामंजस्य करारही झाला आहे.

जल वाहतुकीसाठी कोकणात 24 टर्मिनल उभारले जातील आणि 21 जलमार्ग सुरू होतील असे राज्य सरकारनेच स्पष्ट केले आहे. तिसऱ्या, चौथ्या मुंबईचा नवा विस्तारणारा प्रदेश पाहता वाहतुकीसाठी जलद सुविधा आवश्यक आहे. मुंबई महानगर क्षेत्रात 125 कि.मी. अंतराची जल वाहतूक सध्या सुरू आहे. भविष्यातील गरज ओळखून ती 215 कि.मी.ने विस्तारली जाणार आहे. यासाठीच 21 नवे जलमार्ग आणि आधुनिक टर्मिनस एकूण 3 टप्प्यात पूर्ण केले जाणार आहेत. पुढील तीन वर्षांत जल वाहतुकीच्या सर्व पर्यायांवर विचार करून ते मार्ग खुले केले जाणार आहेत.

मुंबई जल मेट्रोसाठी कोची मेट्रो रेल लिमिटेड यांची सल्लागार म्हणून नियुक्तीही झाली आहे. केरळमधील कोची शहरात हा प्रयोग यशस्वी झाला आहे. या जल मेट्रोच्या धर्तीवर मुंबईतही नवे प्रकल्प आकार घेणार आहेत. पहिल्या टप्प्यात नवी मुंबई, ठाणे, कल्याण, वसई, मीरा भाईंदर ही शहरे जलमार्गाने जोडली जातील; तर मुंबई महानगर क्षेत्रातील 21 जलमार्गांवर एकूण 200 कि.मी. जल वाहतुकीचे जाळे निर्माण केले जाणार आहे. हा जल दळणवळणाचा एक नवा टप्पा ठरणार आहे.

मुंबई महानगर क्षेत्राची लोकसंख्या सध्या तीन कोटींच्या जवळ आहे. त्यामुळे दळणवळण साधने गतिमान करणे अनिवार्य आहे. म्हणूनच जल मेट्रो हा सर्वात सक्षम आणि पर्यावरणपूरक पर्याय म्हणून पुढे आला आहे. महाराष्ट्राच्या सागरी किनारपट्टीचा वापर दळणवळणासाठी सक्षमपणे करता यावा म्हणूनच बोटीच्या निर्मितीपासून टर्मिनसच्या उभारणीपर्यंत सर्व पर्यायांवर अधिक गांभीर्याने शोध सुरू आहे.

मुंबईपासून कोकणात विस्तारणारी जल वाहतूक पर्यटनालाही हातभार लावणारी आहे. नुकतीच सुरू झालेली मुंबई-विजयदुर्ग रो रो सेवा अल्पावधीतच बंद पडली. त्याच्या कारणांचा विचार करावा लागणार आहे. नवे सुरू करताना जुन्याचा विसर पडून चालणार नाही. हा जलमार्ग अधिक महागडा असल्याने तो बंद पडला. त्यामुळे स्वस्त दारात जल वाहतूक सुरू करणे गरजेचे आहे.

पुढील तीन वर्षांत मुंबईच्या आजूबाजूला जल वाहतुकीचे नवे मार्ग सुरू होतील. मुंबई महानगर क्षेत्रात सर्वाधिक वाहतूक कोंडी पाहायला मिळते. त्यामुळे या भागात आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करण्याची पावले उचलली जात आहेत. जलमार्गाचा प्रभावी वापर केल्यास मुंबईला आणखी गती मिळेल. यासाठी स्वीडनची मदतही घेतली जात आहे. याबाबतचे एक आंतरराष्ट्रीय चर्चासत्र पार पडले. त्यामध्ये वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# पनवेलमध्ये पत्रकार उत्कर्ष समितीचा 10 वा वर्धापन दिन व राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा दिमाखात संपन्न

महाराष्ट्र जीत

**पनवेल (प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर) :** पत्रकारिता क्षेत्रातील कार्याला प्रेरणा देणारा आणि विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींना गौरविणारा पत्रकार उत्कर्ष समिती, महाराष्ट्र राज्य यांचा १० वा वर्धापन दिन व राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा २०२६ सोमवार दिनांक ११ मे रोजी पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात अत्यंत दिमाखदार आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात "यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः" या उक्तीनुसार पनवेल महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापती सौ.ममता प्रीतम म्हात्रे,महिला उत्कर्ष समितीच्या प्रदेश अध्यक्षा डॉ. स्मिता अजय पाटील, उपाध्यक्ष सौ.आरती पाटील,सचिव ॲड एम.दिव्या लोकरे तसेच इतर मान्यवर महिलांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करून झाले. त्यानंतर सुमधुर आवाजात गणेश वंदना सादर करण्यात आली. पुढे "जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा..." या महाराष्ट्र गीताने वातावरण भारावून गेले. गायक अलंकार भोईर व विश्वनाथ गायकवाड यांच्या सादरीकरणाने उपस्थितांच्या मनात अभिमानाची भावना जागृत झाली.

पत्रकार उत्कर्ष समितीचे प्रदेश उपाध्यक्ष दिवंगत राम जाधव यांना यावेळी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. तसेच समितीतर्फे त्यांच्या पत्नी सौ. निशा जाधव यांचा माहेरवाशिणीचा सन्मान साडी-चोळी देऊन करण्यात आला. या कृतीतून पत्रकार उत्कर्ष समिती आपल्या सहकाऱ्यांना कधीही वाऱ्यावर सोडत नाही, तर त्यांच्या पाठीशी सदैव ठामपणे उभी राहते, हे अधोरेखित झाले.

कार्यक्रमात पत्रकार उत्कर्ष समितीच्या महिला व पुरुष सदस्यांना ओळखपत्रांचे वितरण करण्यात आले. यानंतर "पत्रकार उत्कर्ष समिती वर्धापन दिन व पुरस्कार सोहळा स्मरणिका २०२६" चे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

यानंतर विविध क्षेत्रातील मान्यवरांना राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यामध्ये आदर्श सेवाव्रती पुरस्कार आर्या अजय देशमुख व डॉ. दिपाली उमाळे, लोककला गौरव पुरस्कार दत्ता हरी भोईर व दिगंबर धर्मा कोळी, समाजरत्न पुरस्कार गजानन देशमुख, आदर्श पत्रकार पुरस्कार गणेश राऊत व राजन देसाई, आदर्श शिक्षक पुरस्कार ज्योती वाघ व सुनील दरवडा, साहित्यरत्न पुरस्कार वृषाली टाकले व सरोज अंदणकर, आदर्श कीर्तनकार पुरस्कार









ह.भ.प. नकुल महाराज भोईर व ह.भ.प. विक्रम महाराज थोरवे, उत्कृष्ट छायाचित्रकार पुरस्कार शंकर शिंदे, आदर्श संस्था पुरस्कार स्नेहज्योत संस्था (मुंबई) तसेच कर्तव्यदक्ष अधिकारी पुरस्कार विजयकुमार राठोड यांना प्रदान करण्यात आले.

तसेच "पंचज्योती सन्मान" या विशेष राज्यस्तरीय पुरस्काराने पाच मानकरी महिलांचा गौरव करण्यात आला. ॲड. अनिशा फणसळकर यांना "न्यायज्योत", मीना घोडविंदे यांना "सेवाज्योत", मोनिका शिंपी यांना "गिरीजन उद्धार ज्योत", रेखा पाटील यांना "शृंगार ज्योत" आणि समता ठाकूर यांना "ज्ञानज्योत" गौरव पुरस्कार देण्यात आले.

कार्यक्रमास पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे तसेच शिवसेना (शिंदे गट) पनवेल तालुका अध्यक्ष परेश पाटील यांनी प्रमुख उपस्थिती लावली. त्यांनी आपल्या मनोगतातून पत्रकार उत्कर्ष समितीच्या कार्याचे कौतुक करत अशा उपक्रमांची समाजाला गरज असल्याचे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाची रंगत वाढविण्यासाठी लोककलावंत दत्ता हरी भोईर यांच्या "आई एकविरा सांस्कृतिक कलामंच"च्या टीमने कोळीगीते व बहारदार लावणी सादर करत प्रेक्षकांचे मन जिंकले. या सादरीकरणामुळे संपूर्ण सभागृहात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाचे निवेदन प्रा. अक्षय पाटील (पेण) व पंडित सर (उरण) यांनी अत्यंत प्रभावी व सुरेख शैलीत केले. त्यांच्या निवेदनामुळे कार्यक्रमाची पकड शेवटपर्यंत टिकून राहिली.

या यशस्वी सोहळ्यामागे पत्रकार उत्कर्ष समितीचे सर्वेसर्वा अध्यक्ष डॉ. अशोक म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या संपूर्ण टीममधील पदाधिकारी, तसेच पत्रकार बंधू-भगिनींनी दिलेला मोलाचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा ठरला. सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांमुळेच हा भव्य कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

एकूणच, पत्रकार उत्कर्ष समितीचा हा वर्धापन दिन व पुरस्कार सोहळा केवळ सन्मानाचा नव्हे, तर प्रेरणा देणारा, समाजकार्याला चालना देणारा आणि सांस्कृतिक समृद्धीचा उत्सव ठरला.

उपस्थित मान्यवर, पुरस्कारार्थी आणि प्रेक्षकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे हा सोहळा संस्मरणीय ठरला.

## पातुर प्राथमिक आरोग्य केंद्रात जागतिक परिचारिका दिन साजरा



महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी भारत चव्हाण सारकिन्ही :** सारकिन्ही,जागतिक परिचारिका दिन पातुर प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये आरोग्य कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला.* कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वैद्यकीय अधिकारी गणेश लोखंडे हे होते. तर स्वास्थ अभगता संगीता जाधव यांनी फ्लॉरेन्स नाईटीन गेल यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकले

प्राथमिक आरोग्य केंद्र पातुर येथे आज 12 मे जागतिक परिचारिका दिन साजरा करण्यात आला. आंतरराष्ट्रीय परिचारिका फ्लोरेन्सनाईटिंगेल ह्यांच्या जीवनशैली व कार्याच्या प्रगल्भ नर्सिंग क्षेत्रातील करण्यात आले या वेळी प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी उपरवट, आरोग्य सहाय्यक व्हि. अवचार , आरोग्य साहाय्यक मनोहर घुगे, औषधी निर्माण अधिकारी मेघराज राऊत, आपला दवाखाना वैद्यकीय अधिकारी डॉ.साजिद शहा,ओपीडी आरोग्य सेविका विजया वानखडे, पल्लवी जाधव परिचर श्री डाखोरे श्री अख्तर बाबू * कार्यक्रमाला उपस्थित होते *

## 16 मे च्या निदर्शने आंदोलनात सहभागी व्हा - महाराष्ट्ररत्न अनिलभाई गांगुर्डे




महाराष्ट्र जीत

**नाशिक (प्रतिनिधी) गोकुळ लोखंडे :** नाशिक येथील पंचवटी राजवाडा येथे उपवर्गीकरण विरोधी संघर्ष समिती नाशिक यांच्या वतीने कॉर्नर मीटिंगचे आयोजन समितीच्या शहराध्यक्ष लक्ष्मीताई ताई ताठे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली

कार्यक्रमास समितीचे मुख्य मार्गदर्शक माजी न्यायाधीश अनिलजी वैद्य साहेब समितीचे अध्यक्ष प्रकाशजी पगारे सर समितीचे मुख्य निमंत्रक महाराष्ट्ररत्न अनिलभाई गांगुर्डे समितीचे कार्याध्यक्ष सनीभाई रोकडे वस्ताद युवा नेते प्रशांत गांगुर्डे, विकीभाऊ ताठे आदी उपस्थित होते..

याप्रसंगी महाराष्ट्ररत्न अनिलभाई गांगुर्डे यांनी सांगितले की बदर समिती अहवाल रद्द करण्यासाठी 16 मे 2026 शनिवार रोजी समाज बांधवानी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सरकारचा निषेध केला पाहिजे याप्रसंगी पंचवटी राजवाडा परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते..!

## माजी विद्यार्थी स्नेहसंमेलन २०२६ उत्साहात संपन्न

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी शाम जगताप :** इंदापूर तालुका ग्रामविकास प्रतिष्ठान संचलित विश्वासराव रणसिंग महाविद्यालय कळंब ता. इंदापूर महाविद्यालयात वाणिज्य शाखा बॅच २०१३ ते २०१६ च्या विद्यार्थ्यांचे "माजी विद्यार्थी स्नेहसंमेलन २०२६" उत्साहपूर्ण संपन्न झाला.

इंदापुर तालुका ग्रामविकास प्रतिष्ठानचे सचिव वीरसिंह रणसिंग प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना माजी विद्यार्थ्यांनी खडतर परिस्थिती मधुन देखील समाजात व विविध क्षेत्रांत केलेल्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाशी असलेले नाते कायम जपावे, असे आवाहन केले.

कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी उपस्थित होते.दहा वर्षांनंतर एकत्र येण्याची संधी मिळाल्याने सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्सुकता





होती. जुन्या आठवणींना उजाळा देत विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन जीवनातील अनुभव,मैत्री आणि आठवणी व्यक्त केल्या. महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.ज्ञानेश्वर गुळिग, डॉ. प्रशांत शिंदे,डॉ.सुहास भैरट, डॉ. तेजश्री हुंबे, प्रा.सोनाली चव्हाण

सेवानिवृत्त प्रा.अरुण कांबळे, प्रा.डॉ. दिलीप मोरे, प्रा. डॉ. बबन भापकर, प्रा. मारुती जाधव, महाविद्यालयीन प्राध्यापक, प्राध्यापिका व कर्मचारी उपस्थित होते.

माजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयास कलर प्रिंटर भेट दिला.स्नेहसंमेलनामुळे जुन्या मैत्रीला नवसंजीवनी मिळाली असून भविष्यातही असे उपक्रम आयोजित करण्याचा संकल्प माजी विद्यार्थी यांनी व्यक्त केला.

## कलियुगात तुम्हाला चांगले कर्मच तारणार - हभप श्रीकृष्ण महाराज राऊत

महाराष्ट्र जीत

**नकूल उपाध्ये /कारंजा लाड प्रतिनिधी :** या संसारात काही काळासाठी आपण पाहुणे होऊन आलो आहे.येथे कोणीही कोणाचे नाही.सर्व काही क्षणभंगूर असून काळाने नाहीसे होणारे आहे.त्यामुळे मिळालेला जन्म वाईट मार्गाने किंवा व्यसनामध्ये न घालवता,आई बापाची सेवा ; चांगले कर्म करून सार्थकी लावावा असे प्रतिपादन रामगाव रामेश्वर येथे सिद्ध गुरु रामनाथ महाराज सभागृहात वै उमेश कडोळे यांचे स्मृती दिना निमित्ताने किर्तन सेवेतून हभप श्रीकृष्ण महाराज राऊत यांनी केले . पुढे बोलतांना श्रीकृष्ण महाराज म्हणाले की ज्याने आई बापाची सेवा केली त्याला पंढरपूरला जाण्याची गरज नाही . रामगाव रामेश्वरच्या पुण्यक्षेत्री सिद्ध गुरु रामनाथ महाराजाच्या सान्निध्यात वैकुंठवासी उमेश कडोळे यांचे पुण्यस्मरण होत आहे. तुकाराम वारकरी परिषदेचे कलामहर्षी वैकुंठवाशी उमेश कडोळे यांना मागील वर्षी दि १९ जून २०२६ रोजी



देवाज्ञा झाली होती.श्रीकृष्ण महाराजांनी आपल्या अमृतमय वाणीमधून भाविक रसिकांना मंत्रमुग्ध केले . कार्यक्रमाला साथसंगत हरिभक्तपरायण विनायक महाराज गुंजाटे यांचे भजनी मंडळाने दिली. किर्तन सोहळयाला मठाधिपती सिद्ध गुरु अभेदनाथ महाराज सिध्दगुरु सेवानाथ महाराज हे उपस्थित होते. शिष्यमंडळी मार्तंडनाथ गुरु अभेदनाथ ; नागनाथ गुरु अभेदनाथ यांची ही उपस्थिती होती .

कार्यक्रमाला कारंजाचे माजी नगराध्यक्ष अरविंद लाठीया, विजय बेन्द्रे गुरुजी, साहेबराव पापळे,द्वारकामाई डॉ.कुंदन श्यामसुंदर,श्री कामाक्षा देवी संस्थान कारंजाचे सचिव रोहित महाजन, लोमेश पाटील चौधरी ; भारतभाऊ पचांगे, ज्ञानेश्वर गुंठेवार तथा वै . उमेश कडोळे यांची प्रेमी मंडळी उपस्थित होती . उपस्थितांनी स्व उमेश कडोळे यांना मौन्य श्रध्दांजली वाहली .

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)

# समाजसेवक गजानन हरणे किसान ब्रिगेडच्या राज्य सरचिटणीस पदी

महाराष्ट्र जीत

**नकूल उपाध्ये / कारंजा लाड प्रतिनिधी :** शेतकरी हक्कांसाठी सातत्याने लढा देत, सामाजिक बांधिलकीची ज्योत तेवत ठेवणारे ज्येष्ठ समाजसेवक गजानन हरणे यांची किसान ब्रिगेडच्या राज्य सरचिटणीसपदी नियुक्ती झाल्याने जिल्ह्यातील शेतकरी चळवळीला नवसंजीवनी मिळाली आहे. गेल्या तब्बल ३५ वर्षांपासून शेतकरी, सर्वसामान्य नागरिक आणि वंचित घटकांच्या प्रश्नांवर निस्वार्थ भावनेने कार्य करणाऱ्या गजानन हरणे यांच्या नियुक्तीचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.

किसान ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश पोहरे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्रदेशाध्यक्ष प्रशांत वराडे यांनी ही नियुक्ती जाहीर केली. अकोला येथील निशांत टॉवरस्थित किसान ब्रिगेड कार्यालयात आयोजित बैठकीमध्ये राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश पोहरे, प्रदेशाध्यक्ष प्रशांत वराडे यांच्यासह विविध मान्यवरांच्या उपस्थितीत गजानन हरणे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

नियुक्तीपत्रात गजानन हरणे यांची शेतकरी प्रश्नांप्रती असलेली प्रखर तळमळ, शेतकरी समाजाच्या उन्नतीसाठी सुरू असलेले सातत्यपूर्ण कार्य, विविध आंदोलनांमधील सक्रिय सहभाग तसेच किसान ब्रिगेडच्या संघटनात्मक कार्याबाबत असलेली त्यांची निष्ठा यांचा गौरवपूर्ण उल्लेख करण्यात आला आहे. शंभरहून अधिक पुरस्कारांनी सन्मानित झालेल्या हरणे यांनी सामाजिक क्षेत्रात उभारलेले कार्य हे प्रेरणादायी असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

राज्य सरचिटणीस या जबाबदारीतून गजानन हरणे यांनी राज्यभरातील शेतकऱ्यांच्या समस्या शासनापर्यंत प्रभावीपणे पोहोचवून किसान ब्रिगेडची भूमिका अधिक ठामपणे मांडावी, तसेच संघटनेच्या आंदोलनांना व्यापक दिशा द्यावी, अशी अपेक्षा संघटनेकडून व्यक्त करण्यात आली.

यावेळी किसान ब्रिगेडच्या वतीने "सध्याच्या बिकट परिस्थितीत जात, धर्म, पक्ष, संघटना आणि झेंडा विसरून शेतकऱ्यांसाठी एकत्र येण्याची काळाची गरज आहे. अल्प कर्जबाजारीपणामुळे शेतकऱ्यांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलू नये," असे भावनिक आवाहन करण्यात आले.



आपल्या नियुक्तीबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना गजानन हरणे यांनी, "शेतकरी हा देशाचा कणा असून त्याच्या न्यायहक्कासाठी येणाऱ्या काळात अधिक आक्रमक आणि प्रभावीपणे कार्य करणार," असा निर्धार व्यक्त केला. त्यांनी आपल्या नियुक्तीचे श्रेय किसान ब्रिगेडचे राष्ट्रीय



प्रवक्ता धनंजय मिश्रा, अमरावती विभागीय अध्यक्ष दिवाकर गावंडे, जिल्हाध्यक्ष भगवंतराव गवळी, जिल्हा कार्याध्यक्ष शरद वानखडे, जिल्हा प्रवक्ता प्रदीप चोरे, माजी प्राचार्य सुभाष भडांगे, प्रा. दादाराव पाथरीकर यांच्यासह सर्व वरिष्ठ पदाधिकाऱ्यांना दिले.

गजानन हरणे यांच्या नियुक्तीमुळे किसान ब्रिगेडच्या शेतकरी चळवळीला अधिक बळ मिळून राज्यभर संघटनेचे कार्य अधिक प्रभावीपणे विस्तारेल, असा विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. त्यांच्या नियुक्तीबद्दल अनेक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

व त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# भाषेच्या कॉलम मध्ये पालीभाषा अवश्य लिहा :- डॉ.भीमराव आंबेडकर




महाराष्ट्र जीत

**नाशिक प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** जनगणनेमधे आपला धर्म बौद्ध.जातीच्या कॉलममध्ये पुर्वी ची जात आणि भाषेच्या कॉलममध्ये पाली भाषा आवश्यक लीहा. डॉ भीमराव आंबेडकर.राष्ट्रीय कार्याध्यक्ष .दि बुध्दीस्ट सोसायटी ऑफ इंडिया.दि बुध्दीस्ट सोसायटी ऑफ इंडिया.वावी ता.सिन्नर. येथे बुध्द विहाराच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. आगोदर आनंद बुद्ध विहाराचे उद्घाटन आणि मुर्ती प्रतीस्ठापणेचा कार्यक्रम संपन्न झाला.सदर प्रसंगी बी एच गायकवाड राष्ट्रीय सचिव दि बुध्दीस्ट सोसायटी ऑफ इंडिया यांनी सांगितले की बुद्ध विहार ही प्रशिक्षणाची केंद्र आहेत.तीथे प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात यावे.सदर प्रसंगी.आद.कृष्णाजी सोनवणे प्र.अध्यक्ष नाशिक जि.सरचीटनीस शरद भोगे.कोषाध्यक्ष रितेश गांगुर्डे.सीन्नर ता.अध्यक्ष निकम.तसेच समता सैनिक दलाचे अधिकारी भालेराव आणि समता सैनिक दलाचे सर्व सैनिक.तसेच नाशिक जिल्हा येथील प्रत्येक तालुक्यातील पदाधिकारी उपस्थित होते

# ट्रायबलच्या 'त्या' लाचखोर अधिका-यांना बडतर्फ करा !
## ट्रायबल फोरमचे राज्यपाल, मुख्यमंत्री, सचिव, ईडीला निवेदन

महाराष्ट्र जीत

**भिवंडी,सुनील झळके :** अनुसूचित जमातीचे जातवैधता प्रमाणपत्र देण्यासाठी अडीच लाखांची लाच स्विकारणा-या उपसंचालक व संगनमताने तीन लाख रुपयांची मागणी करीत एफआयआर मध्ये तब्बल चौदा वेळा नाव आलेल्या वरीष्ठ संशोधन अधिका-याला बडतर्फ करण्याची मागणी 'ट्रायबल फोरम' या संघटनेचे राज्य उपाध्यक्ष बाळकृष्ण मते यांनी केली आहे.

या संदर्भात राज्याचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महासंचालक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, आदिवासी विकास विभागाचे सचिव, ईडी कार्यालय मुंबईला निवेदन पाठविण्यात आले आहे.

अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती कोकण विभाग, ठाणे कार्यालयातील तत्कालीन उपसंचालक यांनी अनुसूचित जमातीचे जातवैधता प्रमाणपत्र देण्यासाठी एका तक्रारदाराकडून तब्बल २ लाख ५० हजार रुपयांची लाच स्विकारली.लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या रायगड पथकाने १३ मार्च २०२६ रोजी त्यांना रंगेहाथ पकडले.

पोलीस उपअधिक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रायगड यांनी तत्कालीन ठाणे उपसंचालक यांच्या विरुद्ध नौपाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करुन लाचलुचपत प्रतिबंधक कायदा १९८८, कलम ७ नुसार गुन्हा नोंद केला आहे. याच तक्रारीत तेथील वरीष्ठ संशोधन अधिकारी यांचे

> **"अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांकडून आदिवासी समुहाच्या घटनात्मक हक्काचे संरक्षण व्हावे.आमच्या सात टक्के आरक्षणापैकी चार टक्के आरक्षण चोरीला गेले आहे.त्यामुळे लाच घेणा-या अधिका-यांवर कठोर कारवाई करण्यात यावी.**
>
> **- बाळकृष्ण मते राज्य उपाध्यक्ष,**
> **ट्रायबल फोरम महाराष्ट्र.**

१४ वेळा नाव आले असून त्यांनीही जातवैधता प्रमाणपत्र देण्यासाठी ३ लाख रुपयांची मागणी केल्याचे नमूद आहे.

एकंदरीत संगनमताने अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती कोकण विभाग, ठाणे कार्यालयात जातवैधता प्रमाणपत्रासाठी या दोघांनी लाखो रुपये घेत असल्याचे प्रथमदर्शनी पुढे आले आहे.बिगर आदिवासींकडून लाखो रुपये उकळायचे आणि त्या मोबदल्यात जातवैधता प्रमाणपत्र देऊन आदिवासींच्या घटनात्मक हक्काच्या राखीव जागा बळकावण्यास अप्रत्यक्ष सहकार्य करणे.ही गंभीर बाब आहे.

सद्यस्थितीत लाचलुचपत प्रकरणी गुन्हा दाखल असलेल्या उपसंचालक यांना निलंबित करण्यात आले असून ३ लाख रुपयांची संगनमताने मागणी करणारे वरीष्ठ संशोधन अधिकारी मात्र तेथेच कार्यालयात कार्यरत आहे. या दोघांनाही सेवेतून बडतर्फ करुन त्यांनी जमवलेल्या संपत्तीची चौकशी करुन दोघांनाही जेरबंद करण्यात यावे. अशी मागणी करण्यात आली आहे.

# सावित्रीच्या लेकिंचे प्रेरणादायी यश !

महाराष्ट्र जीत



श्याम ठाणेदार

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. राज्याचा बारावीचा निकाल ८९.. ७९ टक्के लागला. नेहमीप्रमाणे कोकण विभागाने या निकालात बाजी मारली. कोकण विभागाचा ९४ . १४ टक्के निकाल लागला असून कोकण विभागाने राज्यात अव्वल स्थान पटकावले असून लातूर विभाग निकालात तळाशी राहिला आहे. लातूर विभागाचा निकाल ८४.१४ टक्के इतका लागला आहे. लातूर विभाग टक्केवारीत सर्वांचा मागे पडला हे या निकालातून स्पष्ट दिसते. मागील दशकात लातूर विभाग हा दहावी बारावीच्या निकालात सातत्याने अग्रस्थानी राहिला आहे. लातूर पॅटर्न हा दहावी बारावीच्या निकालासाठी राज्यात प्रसिद्ध होता. आताही नीट आणि जेईई परीक्षेच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांची पसंती लातूरलाच असते. नीट आणि जेईईची तयारी करण्यासाठी विद्यार्थ्यांची पहिली पसंती पुणे, दुसरी पसंती लातूर तर तिसरी पसंती बारामती ही आहे. ज्यांना शक्य आहे ते पालक आपल्या पाल्यांना राजस्थानातील कोटा येथेही पाठवतात मात्र महाराष्ट्रात लातूर पॅटर्नने आपली एक वेगळी ओळख निर्माण केली असताना लातूरची निकालात इतकी घसरण होणे हे आश्चर्यकारकच आहे. अर्थात निकालात घसरण फक्त लातूर विभागाची झाली असे नाही तर संपूर्ण राज्याचा निकाल यावर्षी घसरला आहे. यावर्षी राज्याचा निकाल ८९.७९ टक्के लागला. जो मागील वर्षीच्या तुलनेत २.०९ टक्क्यांनी कमी आहे. मागील वर्षी म्हणजे २०२५ साली बारावीचा निकाल ९१.८८ टक्के होता. यावर्षी बारावीचा निकाल का घसरला ? असा प्रश्न विचारला जात आहे. यावर्षी राज्य सरकारने कॉपी मुक्त परीक्षा अभियान राबवले त्यामुळे हा निकाल घसरला असण्याची शक्यता आहे. अर्थात हे चांगलेच झाले. कॉपीमुक्त परीक्षा या अभियानामुळे राज्याची खरी गुणवत्ता समोर आली. मध्यंतरी राज्याचा निकाल हा ९७ ते ९९ टाक्यांच्या दरम्यान असायचा आणि त्यात शेकडो विद्यार्थ्यांना पैकीच्या पैकी गुण मिळायचे. सरकारने कॉपीमुक्त परीक्षा हे अभियान राबवल्या मुळे कॉपिला काही प्रमाणात आळा बसला आहे. सरकारने हे अभियान यापुढेही चालू ठेवावे. विद्यार्थ्यांनी कॉपिवर अवलंबून न राहता वर्षभर नियमितपणे अभ्यास करावा कारण काळ झपाट्याने बदलत आहे. आता शिक्षणातही तंत्रज्ञानाचा वापर होऊ लागला आहे. आज उत्तरपत्रिका शिक्षक तपासित आहेत पण भविष्यात या परीक्षांच्या उत्तरपत्रिका ए आय च्या मदतीने तपासल्या जातील. जेंव्हा ए आय तंत्रज्ञान वापरून उत्तरपत्रिका तपासल्या जातील तेंव्हा निकाल आणखी घसरण्याची शक्यता आहे.

सोलापूर जिल्हा परिषदेचे तंत्रस्नेही शिक्षक दिसले गुरुजींनी गेल्या वर्षी त्यांच्या वर्गाच्या उत्तरपत्रिका ए आय तंत्रज्ञान वापरून तपासल्या. ए आय तंत्रज्ञानाने अवघ्या काही सेकंदात एक उत्तर पत्रिका तपासून होते हे त्यांनी दाखवून दिले त्यामुळे या तंत्रज्ञानाचा वापर भविष्यात उत्तर पत्रिका तपासण्याकरिता होणार हे नक्की त्यामुळे यापुढे विद्यार्थ्यांना अभ्यासाशिवाय गत्यंतर नाही. अर्थात राज्याचा एकूण निकाल घसरला असला तरी या निकालात मुलींनी नेहमीप्रमाणे बाजी मारली आहे. यावर्षी जवळपास ९३.१५ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. मुलांपेक्षा मुलींचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण जवळपास ४ टक्क्यांनी अधिक आहे. मुलांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ८६.८० टक्के इतके आहे. केवळ बारावीतच नाही तर दहावीच्या परीक्षेतही मुलींनी बाजी मारली. दहावीच्या परीक्षेत ९४.९६ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या तर मुलांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ८९.५६ टक्के इतके आहे याचाच अर्थ बारावी प्रमाणे दहावीच्या परीक्षेतही मुलींनी बाजी मारली. अर्थात दहावी असो की बारावी निकालात कायम मुलीच बाजी मारत असतात हे आपण यावर्षीच नाही तर मागील अनेक वर्षापासून पाहत आहोत. निकालात मुलींनी बाजी मारणे ही नक्कीच अभिमानास्पद बाब आहे. परीक्षार्थी मुलींची संख्या कमी असूनही उत्तीर्ण होणाऱ्या मुलींचे प्रमाण जास्त असणे हे मोठ्या शैक्षणिक आणि सामाजिक परिवर्तनाचे लक्षण आहे. सावित्रीच्या लेकिंची ही गरुड भरारी पाहून संपूर्ण महाराष्ट्राची मान अभिमानाने उंचावली आहे. एकेकाळी केवळ चूल आणि मूल इतकेच ज्यांचे जग होते त्या मुली आज गगनभरारी मारत आहेत. सावित्रीच्या लेकींचे हे यश निश्चितच प्रेरणादायी आहे. एकेकाळी ज्या मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवले जात होते त्याच मुली आज शिक्षण व्यवस्थेचे सर्वात मोठे संचित बनू पाहत आहे. पुरोगामी महाराष्ट्रासाठी ही अभिमानाची बाब आहे.

कठोर परिश्रमाने मुलींनी हे यश मिळवले आणि इतरांना प्रेरणा दिली. कठोर परिश्रमातून मुलींनी हे यश मिळवून समाजाला एक सकारात्मक संदेश दिला आहे.

दहावी, बारावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मनापासून अभिनंदन आणि सर्व विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस मनापासून शुभेच्छा!

# पोलिसांच्या साठी लढणारा बाप माणूस म्हणजे सुधीर भाऊ मुनगंटीवार

महाराष्ट्र जीत

रात्रंदिवस जनतेच्या सुरक्षेसाठी स्वतःचे आयुष्य धोक्यात घालणाऱ्या महाराष्ट्र पोलिसांच्या घराचे स्वप्न अखेर पूर्ण होण्याच्या मार्गावर आले आहे. उशिरा का होईना, पण महाराष्ट्र सरकारने ५४५९ पोलिसांना घरबांधणी अग्रीम म्हणून तब्बल ₹१७६८.०८ कोटी मंजूर करून पोलिसांना मोठा दिलासा दिला आहे.

या निर्णयासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री Devendra Fadnavis यांचे आभार मानले जात असताना, पोलिसांच्या पाठी खंबीरपणे उभे राहिलेले आदरणीय Sudhir Mungantiwar यांचे नाव प्रत्येक पोलिसाच्या मनात आदराने घेतले जात आहे. सत्तेत असूनही अधिवेशनात हा प्रश्न उपस्थित करणारे, प्रत्येक अधिकाऱ्याच्या दालनात जाऊन "महाराष्ट्र पोलिसांसाठी DG लोन किती आवश्यक आहे" हे सांगणारे आणि पोलिसांची खरी परिस्थिती मुख्यमंत्री साहेबांपर्यंत पोहोचवणारे व्यक्तिमत्व म्हणजे सुधीर भाऊ मुनगंटीवार साहेब.महाराष्ट्र पोलिसांच्या घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी लढणारा बाप माणूस म्हणजे सुधीर भाऊ मुनगंटीवार साहेब असून महाराष्ट्र पोलिसांच्या हृदयात पोलिस हृदय सम्राट म्हणून त्यांचे नाव प्रत्येकाच्या मनात आहे.या संपूर्ण लढ्यात पोलिसांवरील प्रेम मनात ठेवून अहोरात्र धावपळ करणारे मनोज बोढरे हे प्रत्येक ठिकाणी पुढे दिसून आले. "माझ्या पोलिस बांधवांना घर मिळवून द्यायचे" हे एकच स्वप्न









डोळ्यासमोर ठेवून त्यांनी संघर्ष सुरू ठेवला. कित्येक वेळा अधिकाऱ्यांना भेटणे, पाठपुरावा करणे, निवेदने देणे, यामध्ये त्यांनी स्वतःला झोकून दिले.

या लढ्यात धडाकेबाज युवा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष श्री अमोल धनराज केंद्रे यांनीही मोठी साथ दिली. महाराष्ट्र पोलिसांचे प्रेम, आशीर्वाद आणि साथ यामुळेच हा लढा यशस्वी झाला असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली आहे.२०१४ ते २०१९ या काळात सुरू असलेली पोलिसांसाठीची व्याजसवलत अनुदान योजना बंद झाल्यानंतर ती पुन्हा सुरू व्हावी यासाठी धडाकेबाज युवा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य संस्थेच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. मुख्यमंत्री, गृहमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्री, आमदार आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भेटी घेऊन पोलिसांच्या घराचा प्रश्न लावून धरला गेला. अखेर महायुती सरकारने ही योजना पुन्हा सुरू करत ५४५९ पोलिसांना न्याय दिला. आज अनेक पोलिस कुटुंबांच्या डोळ्यात आनंदाश्रू आहेत. कारण वर्षानुवर्षे पाहिलेले स्वतःच्या घराचे स्वप्न आता पूर्ण होणार आहे. धडाकेबाज युवा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य संस्थेच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब, सुधीर भाऊ मुनगंटीवार साहेब, मनोज बोढरे आणि या लढ्यात सहभागी झालेल्या प्रत्येकाचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात येत आहे.

# सोमनाथ : अखंड श्रद्धेचे महापर्व

महाराष्ट्र जीत

सोमनाथ मंदिर हे केवळ श्रद्धास्थान नसून भारताच्या सांस्कृतिक पुनरुत्थान, स्वाभिमान आणि अखंड जिद्दीचे प्रतीक आहे. २०२६ मधील 'सोमनाथ स्वाभिमान पर्व' हजार वर्षांच्या संघर्ष, पुनर्बांधणी आणि राष्ट्रीय आत्मविश्वासाच्या इतिहासाला नव्या पिढीसमोर अभिमानाने उभे करत आहे.

सोमनाथ मंदिर भारतातील केवळ एक प्राचीन मंदिर नसून, भारताच्या अभेद्य संस्कृतीचे आणि धैर्याचे मूर्तिमंत प्रतीक आहे. अरबी समुद्राच्या किनाऱ्यावर उभे असलेले हे ज्योतिर्लिंग केवळ श्रद्धेचे केंद्र नाही; तर आक्रमण, पुनर्बांधणी, आत्मसन्मान, राज्यकारभार आणि राष्ट्रीय पुनर्जागरण असा इतिहास आणि वर्तमान आहे. २०२६ मध्ये आपण साजरे करीत असलेले सोमनाथ स्वाभिमान पर्व हे या प्रवासाला नव्या पिढीसमोर आत्मविश्वासाने, अभिमानाने आणि संतुलित भावनेने मांडणारा वळणबिंदू आहे.

१०२६ मध्ये गझनीने सोमनाथवर सर्वप्रथम आक्रमण केले. हे आक्रमण धर्मयुद्ध तर होतेच; पण ती व्यापारमार्ग आणि सोमनाथमध्ये असलेल्या संपत्तीवर लक्ष केंद्रित करणारी आक्रमक कारवाई सुद्धा होती. गुजरातच्या गीर सोमनाथ जिल्ह्याच्या वेरावलजवळील त्या काळी पश्चिम किनारपट्टीवरील महत्त्वाचे बंदर होते, प्रभास पाटण. येथेच सोमनाथ मंदिर होते जे त्या संपूर्ण किनारी अर्थव्यवस्थेचे आणि स्थानिक राजसत्तेचे प्रतीक होते. हे मंदिर फोडणे म्हणजे संपूर्ण व्यवस्था नष्ट करणे होते. औरंगजेबाच्या १७०६ च्या आदेशानंतर, सोमनाथवर अनेक वेळा आक्रमण करण्यात आले, मूर्ती फोडल्या गेल्या; पण एवढे होऊनही सोमनाथ यात्रेचा मार्ग नष्ट झाला नाही आणि त्यावरील श्रद्धाही कमी झाली नाही. सोमनाथावर झालेल्या प्रत्येक आक्रमणानंतर स्थानिक समाज, व्यापारी, साधू-संत, नंतर मराठा व पुढे स्वातंत्र्योत्तर नेतृत्व, कोणी ना कोणी नव्याने उभे राहिले आणि सोमनाथाचे संरक्षण केले. त्यामुळे सोमनाथचा इतिहास केवळ पीडित इतिहास नाही, तर तो प्रतिकार आणि पुनरुत्थान दोन्हींचा एकत्रित इतिहास आहे.

**सोमनाथ आणि महाराष्ट्राचे नाते**

सोमनाथ आणि महाराष्ट्राचे नाते भूगोलाने नव्हे, तर इतिहासाने जोडलेले आहे. अलाउद्दीन खिलजीसारखे आक्रमक गुजरातकडे सरकले आणि सौराष्ट्र-सोमनाथवर हल्ले करणे त्यांच्यासाठी सोपे झाले. महाराष्ट्रातील राजनीतिक स्थैर्य कोसळले की पश्चिम किनाऱ्याला धोका वाढतो, हा पहिला ऐतिहासिक धडा येथेच दिसून आला. शिवरायांनी उभारलेले हिंदवी स्वराज्य, नंतर छत्रपती संभाजी महाराज, राजाराम महाराज, महाराणी ताराबाई यांच्या संघर्षातून टिकून राहिले. पुढे पेशवाईच्या काळात या स्वराज्याने दक्षिण ओलांडून उत्तर-पश्चिम भारतापर्यंत पाय रोवले. मराठा फौजा कृष्णा-गोदावरी पार करत गुजरातकडे गेल्या आणि काही दशकांतच काठियावाड परिसरातील मोगल सामर्थ्य जवळजवळ निष्प्रभ झाले. या बदलत्या शक्तिसंतुलनात सोमनाथ पुन्हा भारतीय राजसत्तेच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली आले.

**मराठा साम्राज्य आणि सोमनाथ**

मराठा साम्राज्याचा सोमनाथशी संबंध सांस्कृतिक, आर्थिक आणि सामरिक या तीन स्तरांवर आहे. सांस्कृतिक स्तरावर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर हा सर्वात मोठा अध्याय. इंदूरच्या होळकर घराण्याची ही राणी, जी महाराष्ट्रातील मराठा राजवटीचा भाग होती, त्यांनी १९८३ मध्ये सोमनाथ मंदिराच्या जीर्णोद्धाराचा निर्णय घेतला. जवळपास शतकभर भग्नावस्थेत असलेले हे मंदिर त्यांनी स्वतःच्या खजिन्यातून पुन्हा उभे केले. इतकेच नव्हे, समुद्राच्या लाटांच्या धक्क्यांपासून, तसेच भविष्यातील नौदल गोळीबारापासून संरक्षण मिळावे, म्हणून नवीन मंदिर थोडे आतल्या बाजूला उभे केले. हा निर्णय फक्त श्रद्धा म्हणून न बघता राज्यकारभारातील स्पेशल इंटेलिजंस म्हणून पाहिला तर अहिल्यादेवी होळकर यांचे दूरदर्शी नेतृत्व दिसून येते.



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी केवळ सोमनाथचेच पुनरुज्जीवन केले असे नाही तर काशी विश्वनाथाचे पुनरुज्जीवन, गया येथे घडवलेली कामे, द्वारकेतील मंदिरांचे सुशोभीकरणही त्यांनी केले. यामागे त्यांचे एकच तत्त्वज्ञान होते आणि ते म्हणजे मोगल काळात जखमी झालेली सभ्यता दगड-दगडातून पुन्हा उभी करणे. होळकर-शिंदे-भोसले अशा सरदारांची भूमिकाही यात महत्त्वाची होती. सोमनाथ हा त्या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांचा एक महत्त्वाचा उपक्रम होता. आर्थिक स्तरावर, मराठ्यांनी सोमनाथ-वेरावल परिसराला केवळ तीर्थक्षेत्र म्हणून नव्हे, तर महसुली मालमत्ता म्हणूनही समजून घेतले. यात्रेकरू कर, बंदरांवरील पायलटेज शुल्क, आसपासच्या जमीन महसुलावर प्रतीकात्मक देवस्थानाचे हक्क, या सर्वांमधून येणारा पैसा उत्तर भारतातील मोहिमा, किल्ल्यांची देखभाल आणि प्रशासनीक खर्च यात वापरला गेला. त्यामुळे सोमनाथच्या सुरक्षेवर खर्च करणे, किल्ले-ठाणी आणि रक्षक ठेवणे हे मराठा सत्तेसाठी भावनिकच नव्हे, आर्थिकदृष्ट्याही योग्य होते.

सामरिक स्तरावर, सोमनाथ-काठियावाड हा भाग मराठा सत्तेसाठी पश्चिमेकडील बफर झोन होता. सोमनाथ, वेरावल आणि आसपासचे किल्ले व ठाणी हे फ्रंटलाईन आऊटपोस्ट म्हणून वापरले गेले. मंदिराचा गाभारा जरी आध्यात्मिक असला, तरी त्याच्या बाहेरील वाड्यांमध्ये आणि चौक्यांमध्ये एका उगवत्या हिंदवी सत्तेचे पुढील मोर्चे उभे होते. या संपूर्ण मराठा इतिहासात गायकवाडांचा स्वतंत्र उल्लेख जरूरी आहे. मूळ महाराष्ट्रातून गेलेले हे बडोद्याचे सरदार गायकवाड यांनी गुजरातच्या अनेक भागांसह काठियावाड परिसरावर दीर्घकाळ राज्य केले. त्यांच्या वतीनेच स्थानिक वतनदार, कारकून, पटेल-पटवारी या संपूर्ण यंत्रणेने सोमनाथ आणि आसपासचा भाग चालवला. यामुळे सोमनाथचा रोजचा कारभार आणि मोठ्या निर्णयांचे वजनही, मराठा सत्तेच्या कक्षामध्येच राहिले होते.

**ब्रिटिश राजवटीच्या अधिपत्याखाली...**

१९व्या शतकात ईस्ट इंडिया कंपनीने मराठा साम्राज्य मोडीत काढण्यास सुरुवात केली, तेव्हा सोमनाथ परिसरातील देवस्थान जमिनी आणि महसूल हा करारांमधील महत्त्वाचा मुद्दा बनला. मराठा घराणी, विशेषतः गायकवाड आणि कंपनी सरकार यांच्यात जो काही तह, करार झाला, त्यात या प्रदेशातील धार्मिक जागा आणि त्यांचे महसुली हक्क यावर अनेक कलमे लावण्यात आली होती. शेवटी महसुली नियंत्रण कंपनीकडे गेले. पूजा-उपासना स्थानिक पुजारी आणि संस्थांकडे ठेवण्यात आली. प्रतीकात्मकदृष्ट्या पाहिले तर, सोमनाथ मराठा राजवटीकडून ब्रिटिश राजवटीकडे गेले.

**२०२६चे स्वाभिमान पर्व!**

स्वातंत्र्यानंतर भारताने हा सर्व इतिहास लक्षात घेऊन काम करणे सुरू केले. जुनागढ भारतात समाविष्ट झाल्यानंतर सरदार वल्लभभाई पटेल यांनी सोमनाथ पुनर्बांधणीचा संकल्प घेतला. हा संकल्प केवळ धार्मिक नव्हता, तर राष्ट्रीय स्वाभिमानाचा होता. पंडित नेहरू, महात्मा गांधी यांचा मात्र याबाबत वेगळा दृष्टिकोन होता. राज्याने थेट मंदिराशी ओळख जोडू नये, धर्मनिरपेक्ष चौकट राखावी, हा त्यांचा आग्रह होता. के. एम. मुन्शी आणि सरदार पटेल यांनी मात्र भारतीय राज्य धर्मनिरपेक्ष राहील; पण जुन्या स्मृती कायम ठेऊन, असे स्पष्ट केले होते. १९५१ मध्ये उभे राहिलेले आधुनिक सोमनाथ मंदिर हा त्याचाच परिपाक होते.

२०२६ मध्ये सोमनाथ स्वाभिमान पर्वाने याला नवा अर्थ दिला आहे. गझनीच्या महमूदच्या पहिल्या आक्रमणाला एक हजार वर्षे पूर्ण होत असताना, देशाने हा प्रसंग अखंड श्रद्धेचा महापर्व म्हणून साजरा करण्याचे ठरवले आहे. गुजरात सरकार, केंद्र सरकार, अनेक सांस्कृतिक संस्था, साधू-संत, विद्वान, आणि सर्वसामान्य भक्त यांच्या सहभागातून हे स्वाभिमान पर्व आकाराला आले. ८ ते ११ जानेवारी २०२६ दरम्यान विविध धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रम, अखंड मंत्रजप, व्याख्यानमाला, प्रदर्शने आणि यात्रांमधून एकच संदेश दिला गेला आणि तो म्हणजे भारताला कोणीही कितीही वेळा तोडण्याचा प्रयत्न केला, तरी त्याचा आत्मा टिकून राहतो. या पर्वानिमित्त देशभरातून यात्रेचे कार्यक्रम आणि दिल्लीपासून निघालेली स्वाभिमान यात्रा हेच दर्शवते की, सोमनाथ फक्त गुजरातचा विषय नसून, तो अखिल भारताचा विषय आहे. वेगाने शहरी होत असलेल्या, डिजिटल पिढीच्या युवकांसाठी हे स्वाभिमान पर्व जणू इतिहासाची जाणीव वर्गात नव्हे, प्रत्यक्ष स्थळी अशी भूमिका निभावत आहे.

या सर्व प्रक्रियेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा सहभाग आणि नेतृत्व विशेष उल्लेखनीय आहे. प्रधानमंत्री मोदी यांनी १०-११ जानेवारीला सोमनाथ येथे जाऊन या पर्वात थेट सहभाग घेतला, कार्यक्रमांना संबोधित केले, स्वाभिमान आणि अखंड श्रद्धा या संकल्पनांना वर्तमान भारताच्या संदर्भात जोडून मांडले. त्यांच्या भाषणांतून आणि उपस्थितीतून एक महत्त्वाचा संदेश गेला आणि तो म्हणजे- सांस्कृतिक स्मृतीचा सन्मान करणे म्हणजे कोणाविरुद्ध द्वेष बाळगणे नाही, उलट, स्वविश्वासाने उभ्या असलेल्या भारताचेच हे लक्षण आहे. म्हणूनच, या पर्वाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदी यांचे अभिनंदन करणे म्हणजे एका सरकारचा नव्हे, तर एका दृष्टिकोनाचा गौरव करणे आहे, इतिहासाकडे कमीपणाच्या भावनेने नव्हे, तर आत्मविश्वासाने पाहावा असा दृष्टिकोन यामागे आहे.

सोमनाथ स्वाभिमान पर्वाने आपल्याला पुन्हा एकदा आठवण करून दिली की, इतिहास हे फक्त हिशेब-मांडणारे पुस्तक नाही; तो राष्ट्राचा सामूहिक मानस आहे. या मानसाचे स्वरूप काय असावे, याचे उत्तर आपल्यासमोर स्पष्ट आहे. जखमा विसरायच्या नाहीत; पण त्यावरच अडकलो तर भविष्य घडत नाही. पुनर्बांधणीची, पुनरुत्थानाची संस्कृती जिवंत ठेवायची असेल, तर सोमनाथची कथा सतत सांगितली गेली पाहिजे. महमूदपासून आणि औरंगजेबापासून, अहिल्याबाई आणि गायकवाडांपासून, पटेल-मुन्शी ते थेट आजच्या नेतृत्वापर्यंत. सोमनाथच्या घंटानादात आजही एकच ध्वनी घुमतो आणि तो म्हणजे आक्रमण होऊ शकतात, सत्ताबदल होऊ शकतात, वाद होऊ शकतात; पण जो समाज आपल्या स्मृतीचा, श्रद्धेचा आणि स्वाभिमानाचा धागा तुटू देत नाही, त्याला इतिहास संपवू शकत नाही.

२०२६चे स्वाभिमान पर्व ही त्या अढळ सत्याची, हजार वर्षे चाललेल्या भारतीय जिद्दीची घोषणा आहे.

आणि भारताच्या नेतृत्वाने ती जाणीवपूर्वक, सन्मानाने आणि उत्तरदायित्वाने देशासमोर मांडली, यासाठी प्रधानमंत्री मोदी यांचे अभिनंदन करावेच लागेल.

**देवेंद्र फडणवीस,**
**मुख्यमंत्री**

# खगोलशास्त्रज्ञांना प्रेमात पाडणारा ग्रह!

महाराष्ट्र जीत

आजपर्यंत मानवाने आपल्या सूर्यमालेबाहेरील हजारो ग्रह शोधले आहेत. वैज्ञानिकांच्या माहितीनुसार आतापर्यंत ५८०० पेक्षा जास्त बाह्यग्रहांचा शोध लागला आहे. त्यामध्ये काही ग्रह पूर्णपणे बर्फाने झाकलेले आहेत, काही वायूंचे महाकाय गोळे आहेत तर काही ग्रहांवर सतत वादळे आणि आगीचे महासागर असल्याचे संकेत मिळाले आहेत. मात्र या सर्व ग्रहांमध्ये LHS ३८४४ b सारखी टोकाची परिस्थिती अत्यंत दुर्मिळ मानली जाते. म्हणून खगोलशास्त्रज्ञ त्याच्या अधिकच प्रेमात पडले आहेत.


गेले काही दिवस आंतरराष्ट्रीय माध्यमांमध्ये एका रहस्यमय ग्रहाची जोरदार चर्चा सुरू आहे. पृथ्वीपासून तब्बल ४८.५ प्रकाशवर्षे दूर असलेल्या या ग्रहाने अंतराळ संशोधकांची उत्सुकता प्रचंड वाढवली आहे. कारण हा ग्रह पृथ्वीसारखा खडकाळ असला, तरी त्याची परिस्थिती अतिशय भयंकर आहे. LHS ३८४४ b असे या ग्रहाचे नाव असून तो इतका उष्ण आहे की त्याच्या पृष्ठभागावर लोखंड, ॲल्युमिनियम आणि शिसे यासारखे धातू सहज वितळू शकतात. अमेरिकेची अंतराळ संस्था नासा आणि जगप्रसिद्ध जेम्स वेब स्पेस टेलिस्कोप (JWST) यांच्या मदतीने या ग्रहाचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. या संशोधनामुळे सुपर-अर्थ प्रकारातील ग्रहांविषयी अनेक नवीन गोष्टी समोर आल्या आहेत.

या ग्रहाचा शोध तसा नवीन नाही. २०१८ मध्ये नासाच्या TESS (ट्रान्झिटिंग एक्सोप्लॅनेट सर्व्हे सॅटेलाइट) मोहिमेद्वारे हा ग्रह प्रथम शोधण्यात आला. TESS ही विशेष दुर्बीण आकाशातील लाखो ताऱ्यांवर सतत लक्ष ठेवते. एखादा ग्रह ताऱ्यासमोरून जाताना त्या ताऱ्याचा प्रकाश किंचित कमी होतो आणि त्यावरून ग्रह अस्तित्वात असल्याचे स्पष्ट होते. अशाच प्रकारे LHS ३८४४ b हा ग्रह शास्त्रज्ञांच्या नजरेस पडला. पुढील निरीक्षणांमधून हा ग्रह एका रेड ड्वार्फ ताऱ्याभोवती फिरत असल्याचे स्पष्ट झाले. रेड ड्वार्फ म्हणजे आकाराने लहान आणि तुलनेने थंड तारा. मात्र हा ग्रह त्या ताऱ्याच्या इतक्या जवळ आहे की तिथे प्रचंड उष्णता निर्माण होते.

हा ग्रह पृथ्वीपेक्षा सुमारे ३० टक्के मोठा असल्याने त्याला Super-Earth या प्रकारात वर्गीकृत करण्यात आले आहे. सुपर-अर्थ हा शब्द ऐकला की अनेकांना तो पृथ्वीसारखा ग्रह असेल असे वाटते. मात्र प्रत्यक्षात त्याचा अर्थ पृथ्वीपेक्षा आकाराने मोठा पण नेपच्यूनसारख्या वायू ग्रहांपेक्षा लहान असा ग्रह. LHS ३८४४ b हा ग्रह खडकाळ आहे, पण पृथ्वीसारखे वातावरण, पाणी किंवा जीवनासाठी आवश्यक परिस्थिती तिथे अजिबात नाही.

या ग्रहाचे सर्वात धक्कादायक वैशिष्ट्य म्हणजे त्याचे तापमान. दिवसा या ग्रहाचे तापमान ७२५ अंश सेल्सिअस इतके आहे. तुलना केली तर पृथ्वीवरील ज्वालामुखीतील लावा साधारण ७०० ते १२०० अंश सेल्सिअस दरम्यान असतो. म्हणजेच या ग्रहाचा पृष्ठभाग सतत उकळत्या भट्टीसारखा असू शकतो. काही संशोधकांच्या मते या ग्रहावर वितळलेल्या खडकांचे महासागर असू शकतात. तिथे लाव्हासारखा पदार्थ वाहत असण्याची शक्यता देखील व्यक्त करण्यात आली आहे. जर हे अंदाज खरे ठरले, तर हा ग्रह विश्वातील सर्वात उष्ण खडकाळ ग्रहांपैकी एक मानला जाईल.

LHS ३८४४ b या ग्रहाची आणखी एक विशेष बाब म्हणजे तो टायडली लॉक्ड आहे. याचा अर्थ ग्रहाची एक बाजू कायम ताऱ्याकडे असते, तर दुसरी बाजू कायम अंधारात राहते. हे दृश्य आपल्या चंद्रासारखे आहे. जशी चंद्राची एकच बाजू कायम पृथ्वीला दिसते, तसाच हा ग्रह कायम एका बाजूने ताऱ्याकडे तोंड करून फिरतो. त्यामुळे दिवसाच्या बाजूवर प्रचंड उष्णता असते, तर रात्रीच्या बाजूवर अत्यंत थंडी असण्याची शक्यता आहे. संशोधकांच्या



मते हा तापमानातील फरक अत्यंत टोकाचा असू शकतो. या ग्रहाबाबत सर्वात धक्कादायक गोष्ट म्हणजे त्यावर पृथ्वीसारखे वातावरण नाही. पृथ्वीवरील वातावरण उष्णता नियंत्रित करते, ढग आणि पाऊस निर्माण करते तसेच सूर्याच्या धोकादायक किरणांपासून संरक्षण देते. मात्र LHS ३८४४ b वर वातावरण जवळजवळ नसल्यामुळे उष्णता थेट जमिनीवर आदळते. वारे, ढग किंवा पावसाचा प्रश्नच उद्भवत नाही. त्यामुळे हा ग्रह पूर्णपणे निर्जन आणि ओसाड बनला आहे.

JWST मधील MIRI उपकरणाने या ग्रहातून निघणारी इन्फ्रारेड ऊर्जा मोजली. त्यावरून शास्त्रज्ञांनी ग्रहाच्या पृष्ठभागाचा अंदाज बांधला. संशोधकांच्या मते या ग्रहाचा पृष्ठभाग बसाल्ट नावाच्या काळ्या ज्वालामुखी खडकांनी बनलेला असू शकतो. हे खडक पृथ्वीवरील ज्वालामुखी प्रदेशात आढळतात. काही संशोधकांनी तर या ग्रहाला Dark Lava World असेही संबोधले आहे. विशेष म्हणजे, इतक्या दूर असलेल्या खडकाळ ग्रहाच्या पृष्ठभागाचा थेट अभ्यास प्रथमच करण्यात आला आहे. त्यामुळे हा शोध अंतराळ विज्ञानासाठी मोठी क्रांती मानला जात आहे.

विशेष म्हणजे हा ग्रह त्याच्या ताऱ्याभोवती अत्यंत वेगाने फिरतो. पृथ्वीला सूर्याभोवती फिरण्यासाठी ३६५ दिवस लागतात, पण LHS ३८४४ b ला त्याच्या ताऱ्याभोवती एक फेरी पूर्ण करण्यासाठी फक्त ११ तास लागतात. यावरून हा ग्रह त्याच्या ताऱ्याच्या किती जवळ आहे याची कल्पना येते. सततच्या विकिरणामुळे आणि उष्णतेमुळे या ग्रहावरील वातावरण नष्ट झाले असण्याची शक्यता शास्त्रज्ञांनी व्यक्त केली आहे.

या ग्रहाबाबत आणखी एक रोचक सिद्धांत मांडला जात आहे. काही शास्त्रज्ञांच्या मते या ग्रहावर एकेकाळी वातावरण आणि कदाचित पाणीही असू शकेल. मात्र ताऱ्याच्या सततच्या उष्णतेमुळे ते सर्व नष्ट झाले असावे. म्हणूनच काही संशोधक LHS ३८४४ b ला Dead Earth म्हणजेच मृत पृथ्वी असे म्हणतात. काही शास्त्रज्ञांच्या मते आपल्या पृथ्वीचे तापमान वाढत राहिले तर हजारो वर्षांनंतर पृथ्वीचे काय होऊ शकते याचे संकेत हा ग्रह देत आहे.

आजपर्यंत मानवाने आपल्या सूर्यमालेबाहेरील हजारो ग्रह शोधले आहेत. वैज्ञानिकांच्या माहितीनुसार आतापर्यंत ५८०० पेक्षा जास्त बाह्यग्रहांचा शोध लागला आहे. त्यामध्ये काही ग्रह पूर्णपणे बर्फाने झाकलेले आहेत, काही वायूंचे महाकाय गोळे आहेत तर काही ग्रहांवर सतत वादळे आणि आगीचे महासागर असल्याचे संकेत मिळाले आहेत. Kepler-४५२b हा ग्रह पृथ्वीसारखा असू शकतो असा अंदाज व्यक्त केला जातो. TRAPPIST-1e हा ग्रह राहण्यायोग्य क्षेत्रात असल्यामुळे वैज्ञानिकांसाठी महत्त्वाचा मानला जातो. तर Proxima Centauri b हा पृथ्वीच्या सर्वात जवळच्या ताऱ्याभोवती फिरणारा ग्रह आहे. मात्र या सर्व ग्रहांमध्ये LHS ३८४४ b सारखी टोकाची परिस्थिती अत्यंत दुर्मिळ मानली जाते.

प्रश्न असा पडतो की, वातावरण नसलेल्या आणि जीवनासाठी पूर्णपणे अयोग्य असलेल्या ग्रहाचा अभ्यास का केला जातो? यामागे मोठे वैज्ञानिक कारण आहे. शास्त्रज्ञांच्या मते पृथ्वीवरील वातावरण किती महत्त्वाचे आहे हे समजण्यासाठी अशा ग्रहांचा अभ्यास आवश्यक आहे. हवामान बदलाचा परिणाम समजून घेण्यासाठीही या ग्रहांची तुलना उपयुक्त ठरते. आजपर्यंत पृथ्वीसारखा पूर्णपणे जीवनास अनुकूल ग्रह शास्त्रज्ञांना सापडलेला नाही. त्यामुळे विश्वातील प्रत्येक ग्रह पृथ्वीबद्दल काहीतरी नवीन शिकवतो. भविष्यात JWST आणि इतर अत्याधुनिक दुर्बिणींच्या मदतीने या ग्रहावर ज्वालामुखी आहेत का, पृष्ठभागावर लाव्हा महासागर आहेत का ?, रात्रीच्या बाजूवर काय घडते ? आणि ग्रहाच्या आत वितळलेले लोखंड आहे का ? याचा अधिक सखोल अभ्यास केला जाणार आहे. LHS ३८४४ b हा ग्रह म्हणजे विश्वातील टोकाच्या परिस्थितीचे एक जिवंत उदाहरण आहे. तो आपल्याला सांगतो की, पृथ्वी किती खास आहे आणि जीवनासाठी योग्य वातावरण निर्माण होणे किती दुर्मिळ गोष्ट आहे ? ७२५ अंश सेल्सिअस तापमान, वातावरणाचा अभाव आणि जळत्या लाव्हासारखा पृष्ठभाग असलेला हा ग्रह विज्ञानासाठी एक मोठे रहस्य बनला आहे. कदाचित भविष्यात या ग्रहावरील संशोधनामुळे मानवाला विश्वातील जीवनाच्या शोधात नवे मार्ग सापडतील.

त्यासोबतच पृथ्वी आणि LHS ३८४४ b यांच्यातील तुलना केली तर आपल्या ग्रहाचे महत्त्व अधिक स्पष्टपणे समोर येते. पृथ्वीवर योग्य तापमान, पाणी, ऑक्सिजनयुक्त वातावरण आणि सूर्यापासून योग्य अंतर असल्यामुळे येथे सजीवसृष्टी फुलू शकली. पृथ्वीवरील वातावरण सूर्याच्या घातक किरणांपासून संरक्षण करते, तापमान नियंत्रित ठेवते आणि पावसाचे चक्र निर्माण करते. त्यामुळेच मानव, वनस्पती आणि इतर जीव पृथ्वीवर सुरक्षितपणे जगू शकतात. याच कारणामुळे वैज्ञानिक पृथ्वीकडे केवळ एक ग्रह म्हणून नाही, तर विश्वातील एक अत्यंत दुर्मिळ आणि मौल्यवान जग म्हणून पाहतात. LHS ३८४४ b सारखे ग्रह आपल्याला हे शिकवतात की पृथ्वीवरील वातावरण, पाणी आणि नैसर्गिक संतुलन किती महत्त्वाचे आहे. विश्वात हजारो ग्रह सापडले असले, तरी आजपर्यंत पृथ्वीसारखी जीवनासाठी पूर्णपणे अनुकूल परिस्थिती कुठेही आढळलेली नाही.

त्यामुळे अंतराळातील हे रहस्यमय ग्रह केवळ विज्ञानासाठीच नाही, तर मानवाला पृथ्वीचे महत्त्व समजून घेण्यासाठीही अत्यंत आवश्यक ठरत आहेत.

**अनिकेत निंबाळकर**